दिनेश
बिल्डींग मटेरियल सप्लायर्स
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर, वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक (सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368, 9860330587

दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे




वर्ष ५ । अंक २९४ । सोमवार २४ ऑगस्ट २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

# सुशील थोरात हल्ला प्रकरणी तीन आरोपींना अटक

**स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेची कारवाई । फरार झालेल्या तिघांना संभाजीनगर येथून घेतले ताब्यात**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** येथील पत्रकार सुशील थोरात यांच्यावर हल्ला करून फरार झालेल्या तीन आरोपींच्या मुसक्या आवळण्यात स्थानिक गुन्हे शाखेला यश आले आहे. छत्रपती संभाजीनगर येथील वाळुंज एमआयडीसी परिसरात एलसीबीच्या पथकाने ही कारवाई केली. हेमंत उर्फ सोनू दत्तात्रय कोहक (वय २७, रा. बोल्हेगाव, अहिल्यानगर), महेश उर्फ पप्पू दशरथ मते (वय २७, रा. सावेडी, अहिल्यानगर) व प्रशांत शिवाजी निक्रड (वय २५, रा. सावेडी, अहिल्यानगर) अशी अटक आरोपींची नावे आहेत.

दिनांक २० ऑगस्ट रोजी पत्रकार सुशील मारूतराव थोरात (वय ४९) हे आपल्या कारने जात असताना, सोनू कोहक याने त्याच्या मोपेडने कारला धडक दिली. यानंतर, जुन्या बातम्या लावून प्रसिद्ध केल्याच्या रागातून सोनू कोहक, पप्पू मते, विकी ढवण, प्रशांत निक्रड आणि एका अनोळखी पहिलवानाने पत्रकार थोरात व त्यांच्या मुलावर हल्ला चढवला. आरोपींनी थोरात यांना लाथाबुक्क्यांनी व डोक्यात, पाठीवर दगडाने मारहाण करत गळा आवळून जीवे मारण्याचा प्रयत्न केला. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात बीएनएस कलम १०९(१), ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(३) सह इतर कलमांन्वये दाखल करण्यात आला होता.घटनेचे गांभीर्य ओळखून पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे ■ पान ४ वर

**दोघे सराईत गुन्हेगार**

पोलीस तपासात आरोपी सोनू कोहक आणि प्रशांत निक्रड हे सराईत गुन्हेगार असल्याचे समोर आले असून, त्यांच्यावर यापूर्वीही तोफखाना पोलीस ठाण्यात गंभीर गुन्हे दाखल आहेत. ताब्यात घेतलेल्या आरोपींना तोफखाना पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे.

**न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीचा प्रस्ताव वर्षानुवर्षे धुळखात; आंदोलनाचा इशारा**

# 'समान काम, समान वेतन' मागणीसाठी न्यायालयीन कर्मचारी संपाच्या पवित्र्यात - अंकुश सांगळे

**१६ सप्टेंबर, १६–१७ ऑक्टोबरला काळ्या फिती; ५ नोव्हेंबरला सामूहिक रजा, १७ नोव्हेंबरपासून बेमुदत संपाचा इशारा**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** महाराष्ट्र राज्यातील दुय्यम न्यायालयांमध्ये कार्यरत न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीचा प्रस्ताव उच्च न्यायालयाने मंजूर करून ३१ जानेवारी २०२५ रोजी शासनाकडे पाठविला आहे. मात्र, या प्रस्तावावर शासनाकडून अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नसल्याने न्यायालयीन कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी निर्माण झाली आहे. समान कामासाठी समान वेतनाच्या मागणीसाठी महाराष्ट्रातील दुय्यम न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी आता आंदोलनाची भूमिका घेतली असून, मागण्या मान्य न झाल्यास बेमुदत संपाचा इशारा देण्यात आला आहे.

या पार्श्वभूमीवर अहमदनगर जिल्हा न्यायालयीन कर्मचारी संघटनेची बैठक संपन्न झाली. महाराष्ट्र राज्यातील दुय्यम न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या आंदोलनाच्या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर ही बैठक घेण्यात आली. महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी गट–क संघटना, लघुलेखक, बेलीफ महासंघ तसेच चतुर्थ श्रेणी महासंघ यांची एकत्रित बैठक महासंघाचे अध्यक्ष दादा निकम यांच्या अध्यक्षतेखाली १६ ऑगस्ट रोजी मुंबई येथे पार पडली होती. या बैठकीत आंदोलनाची दिशा निश्चित करण्यात आली. त्यानंतर अहमदनगर जिल्हा न्यायालयीन कर्मचारी संघटनेची विशेष बैठकीचे आयोजित करण्यात आले होते.

बैठकीस अध्यक्ष अंकुश सांगळे, कार्याध्यक्ष शिरीष ढाळे, सचिव आनंद सोनपसारे, उपाध्यक्ष रवींद्र सूर्यपुजारी, आर. एन. गुंडू, आस्लम सय्यद, अजिनाथ पाडळकर, अतुल खरपुडे, बंडू बडे, सविता भालेराव, आर. डी. बेल्हेकर, डी. एस. परदेशी, अनिल निमसे, म्हाळसाकांत लिपाने, एस. एस. भालेराव, एस. एल. क्षिरसागर, वंदना केदार, अर्चना झिंजे, एस. एस. वाघ, व्ही. एच. खरात, सागर गायकवाड, प्रशांत खराडे, सुजित सानप, शिवाजी चांडोळे, अशोक जंगले, श्याम काठे, अमर तिवारी, ए. बी. मरकड, सुनील भाबड आदींसह न्यायालयीन कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी अध्यक्ष अंकुश सांगळे म्हणाले की, न्यायव्यवस्थेचा कणा म्हणून वर्षानुवर्षे प्रामाणिकपणे, जबाबदारीने आणि अत्यंत ■ पान ४ वर

# एलसीबीचे चार ठिकाणी छापे, सव्वाचार लाखांचा गुटखा जप्त



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने चार ठिकाणी छापे टाकून चार लाख ३५ हजार ८५ रुपयांचा गुटखा आणि सुगंधित तंबाखू जप्त केली. या प्रकरणी ७ आरोपींविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

एसपींच्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचाऱ्यांची ३ विशेष पथके तयार करून कारवाईसाठी रवाना करण्यात आली.

दिनांक २३ ऑगस्ट रोजी या पथकांनी श्रीरामपूर शहर, शनिशिंगणापूर आणि संगमनेर शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत धाडी टाकल्या.

श्रीरामपूर शहरात आरोपी शाहरुख शहानूर शहा (वय ३१) याला अटक करण्यात आली असून शोएब शेख (रा. श्रीरामपूर) हा फरार आहे. शनिशिंगणापूर येथील तिरमल वस्ती येथे छापा टाकला .आरोपी अनिल माधव वाघ फरार झाला आहे. संगमनेर शहरात पहिल्या कारवाईत ३६ हजार ७८८ रुपयांचा गुटखा जप्त ■ पान ४ वर

# हत्यारांसह दहशत माजवणारे चौघे जेरबंद

**एमआयडीसी पोलिसांच्या कारवाईत सव्वा लाखाचा मुद्देमाल जप्त**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** नगर–मनमाड रोडवरील साईदीप हॉटेलच्या मागे धारदार हत्यारांसह लोकांमध्ये दहशत निर्माण करणाऱ्या ४ जणांना एमआयडीसी पोलिसांनी रंगेहाथ पकडून गजाआड केले आहे. यात दोन प्रौढ आरोपींसह दोन विधीसंघर्षित बालकांचा समावेश आहे. पोलिसांच्या या कारवाईत एकूण १ लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पेट्रोलिंगदरम्यान पोलीस अंमलदार देविदास खेडकर यांना गुप्त माहिती मिळाली की, साईदीप हॉटेलच्या मागे ■ पान ४ वर

# अहिल्यानगर शहरात पोलिसांचे ऑलआऊट अन् कोम्बिंग ऑपरेशन

**वॉरंटमधील ४७ आरोपींवर कारवाई**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नगर शहरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी आणि गुन्हेगारीला वेसण घालण्यासाठी अहिल्यानगर शहर उपविभागात रविवारी रात्री 'ऑलआऊट' आणि 'कोम्बिंग ऑपरेशन' राबवण्यात आले. पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन आणि अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे यांच्या मार्गदर्शनाखाली ही धडक कारवाई करण्यात आली.

दिनांक २३ ऑगस्ट रोजी रात्री ११ ते २४ ऑगस्ट रोजी पहाटे ५ वाजेच्या दरम्यान कोतवाली, तोफखाना आणि भिंगार कॅम्प पोलीस ठाण्याच्या हद्दीत हे ऑपरेशन राबवले गेले. उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. दिलीप टिपरसे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने संपूर्ण शहरात शोधमोहीम राबवली.

या मोहिमेत महाराष्ट्र पोलीस कायद्यानुसार २ गुन्हे आणि दारूबंदी कायद्यान्वये (कलम ६५ ई) ६ गुन्हे दाखल करण्यात आले. अजामीनपात्र वॉरंटमधील २७ आणि जामीनपात्र वॉरंटमधील २० अशा एकूण ४७ आरोपींना शोधून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात आली. दहा पाहिजे व फरारी आरोपी, ६ हद्दपार आरोपी तसेच रेकॉर्डवरील ६ गुन्हेगारांची कसून तपासणी करण्यात आली.

या मोहिमेत पोलीस निरीक्षक नितीन देशमुख (कोतवाली), बालाजी वैद्य (तोफखाना), सहाय्यक पोलीस निरीक्षक तेजश्री थोरात (भिंगार कॅम्प) यांच्यासह उपविभागातील विविध पोलीस ठाण्यांचे अधिकारी व मोठ्या संख्येने पोलीस अंमलदार सहभागी झाले होते.



## दै. आकर्षण निवडक

### रोटरी क्लब ऑफ अहिल्यानगर सेंट्रलतर्फे २४ ते २९ ऑगस्टदरम्यान सहा दिवसीय अ‍ॅक्युप्रेशर आरोग्य शिबिर




अहिल्यानगर - रोटरी क्लब ऑफ अहिल्यानगर सेंट्रलच्या वतीने नागरिकांसाठी २४ ते २९ ऑगस्ट २०२६ या कालावधीत सहा दिवसीय अ‍ॅक्युप्रेशर आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर मार्कंडेय संकुल, नालेगाव, नेप्ती नाक्याजवळ, नेत्रदीप आय क्लिनिकसमोर, अहिल्यानगर येथे सकाळी ९ ते दुपारी १ आणि सायंकाळी ४ ते रात्री ८ या वेळेत होणार आहे. शिबिरामध्ये राजस्थान येथील राम मनोहर लोहिया आरोग्य जीवन संस्थान यांच्या वतीने डॉ. एम.ए.चायनन ( ) व त्यांची टीम अ‍ॅक्युप्रेशर थेरपीद्वारे मार्गदर्शन व सेवा देणार आहे. अ‍ॅक्युप्रेशरच्या माध्यमातून रक्तदाब नियंत्रण, पाठदुखी, हात-पायांमधील मुंग्या व सुन्नपणा, पोटाचे विकार, वातविकार, बद्धकोष्ठता, सायटिका, सांधेदुखी, मानदुखी, थायरॉईड, मायग्रेन, दमा आदी विविध आरोग्य समस्यांमध्ये मदत होऊ शकते. शिबिरात अ‍ॅक्युप्रेशरसह सुजोक, व्हायब्रेशन व मॅग्नेट थेरपीचीही माहिती व सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. सहा दिवसांसाठी नोंदणी शुल्क केवळ २०० असून नोंदणी मर्यादित असल्याने इच्छुक नागरिकांनी लवकरात लवकर नोंदणी करावी, असे आवाहन रोटरी क्लब ऑफ अहिल्यानगर सेंट्रलचे अध्यक्ष रो. अमर गुरप व सचिव रो. सुनील मुथा यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी रो.अमर गुरप ९८६०२४९००५, रो.सुनील मुथा ९०२८०३२०१७, रो.गिरीश मुळे ९८९००३४८१३, रो.डॉ.दिलीप बागल ९४२२२२३६७० यांच्याशी संपर्क करावे.

### रेशनच्या धान्याचा दर्जा व शिवभोजन थाळीची गुणवत्ता तपासा, रामदास फुले यांची मागणी

अहिल्यानगर - अहिल्यानगर जिल्ह्यातील रेशन दुकानांमधून लाभार्थ्यांना वितरित करण्यात येणाऱ्या धान्याच्या गुणवत्तेबाबत गंभीर तक्रारी असून लाभार्थ्यांना निकृष्ट व खराब धान्य मिळत असल्याने या प्रकरणाची तातडीने तपासणी करण्यात यावी, अशी मागणी अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे नेते व सामाजिक कार्यकर्ते रामदास फुले यांनी केली आहे. तसेच गरजू व सर्वसामान्य नागरिकांसाठी सुरू असलेल्या शिवभोजन थाळीची गुणवत्ता आणि भोजनाच्या दर्जाचीही संबंधित विभागामार्फत तपासणी करण्यात यावी, तसेच रेशन कार्डसह ऑनलाइन प्रक्रिया गतिमान करावी तसेच गॅस वितरण सुरळीत करा अशी मागणी त्यांनी राज्याचे मंत्री छगन भुजबळ यांच्याकडे निवेदनाद्वारे केली. नाशिक येथे झालेल्या अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या राज्य कार्यकारिणी बैठकीत रामदास फुले यांनी मंत्री छगन भुजबळ यांची भेट घेऊन या मागण्यांचे निवेदन सादर केले. रेशनच्या धान्याचा दर्जा हा थेट सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित असल्याने धान्य वितरणापूर्वी त्याची योग्य तपासणी होणे आवश्यक आहे. निकृष्ट किंवा खराब धान्य लाभार्थ्यांच्या वाट्याला येत असल्यास संबंधित यंत्रणेने त्याची गंभीर दखल घेऊन दोषींवर कारवाई करावी, अशी मागणीही त्यांनी केली. त्याचबरोबर शिवभोजन थाळीच्या माध्यमातून नागरिकांना दिल्या जाणाऱ्या भोजनाची गुणवत्ता, स्वच्छता, तयार करण्याची पद्धत तसेच भोजनाच्या दर्जाची नियमित तपासणी करण्याची आवश्यकता असल्याचे फुले यांनी निवेदनात नमूद केले. संबंधित विभागाने अचानक तपासणी करून वस्तुस्थितीची पाहणी करावी आणि तक्रारी आढळल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. ''रेशन दुकानातून मिळणारे धान्य हे गरीब व गरजू नागरिकांच्या जीवनाचा महत्त्वाचा आधार आहे. मात्र लाभार्थ्यांना निकृष्ट व खराब धान्य मिळत असल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत आहेत. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांनी केवळ कागदोपत्री तपासणी न करता प्रत्यक्ष रेशन दुकानांवर जाऊन धान्याची गुणवत्ता तपासावी. नागरिकांना चांगल्या दर्जाचे व सुरक्षित धान्य मिळणे हा त्यांचा हक्क आहे. या हक्काशी कोणत्याही परिस्थितीत तडजोड होता कामा नये,'' असे रामदास फुले यांनी सांगितले. ''शिवभोजन थाळी ही गरजू आणि सर्वसामान्य नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाची योजना आहे. या योजनेचा लाभ घेणाऱ्या नागरिकांना दर्जेदार, स्वच्छ आणि चांगल्या गुणवत्तेचे भोजन मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे शिवभोजन केंद्रांवर भोजनाची गुणवत्ता, स्वच्छता आणि उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या अन्नपदार्थांची नियमित तपासणी करावी. रेशन धान्य आणि शिवभोजन थाळी या दोन्ही बाबी जनतेच्या हिताशी निगडित असल्याने शासनाने तातडीने दखल घेऊन प्रभावी तपासणी यंत्रणा राबवावी,'' अशी मागणीही फुले यांनी केली. यावेळी प्रदेश प्रवक्ते नागेश गवळी, प्रदेश चिटणीस अंबादास गारुडकर, अनिल निकम, जिल्हाध्यक्ष सुभाष लोंढे, जिल्हा उपाध्यक्ष भरत गारुडकर, समता परिषदेचे नेते रामदास फुले, सोमनाथ धाडगे , ब्रिजेश ताठे, अभिषेक चिपाडे, वसंत रांधवन , युवराज हजारे, संतोष हजारे, बबनराव घुमटकर, रामदास लोंढे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते व समता सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिंगवेमध्ये चर्चासत्रातून शेतकऱ्यांशी संवाद



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनचे कृषी महाविद्यालय, विळदघाट, अहिल्यानगर यांच्या वतीने ग्रामीण कृषी जागरूकता कार्यानुभव कार्यक्रम २०२६-२७ अंतर्गत शिंगवे येथे शेतकरी चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. या चर्चासत्राच्या माध्यमातून शेतकऱ्यांशी विविध कृषी विषयांवर संवाद साधत आधुनिक तंत्रज्ञान व शास्त्रीय शेती पद्धतींची माहिती देण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिंगवे येथील श्री.वसंत मुरलीधर जाधव सर हे होते. डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनचे संचालक (तांत्रिक) प्रा. सुनील कल्हापुरे, प्राचार्य प्रा. डॉ. सोमेश्वर राऊत, सरपंच सौ. जिजाबाई दत्तात्रय काळे, उपसरपंच श्री. व्यंकटेश जाधव, माजी सरपंच श्री.सुनील जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच उपकृषी अधिकारी श्री. विजय सोमवंशी,कार्यक्रम समन्वयक प्रा. किरण दांगडे, कृषी सेवक सौ.ज्योती पाचारणे, प्रगतशील शेतकरी दत्तात्रय काळे,ज्ञानदेव जाधव,गोकुळ बोरुडे,संतोष जाधव,प्रकाश मुसमाडे, ज्ञानदेव कोऱ्हाळे, लक्ष्मण शिंदे यांच्यासह कृषी महाविद्यालयातील विद्यार्थी व ग्रामस्थ, शेतकरी उपस्थित होते.

चर्चासत्रात मका पिकातील लष्करी अळीचे एकात्मिक कीड व्यवस्थापन, मृदा परीक्षणाचे महत्त्व तसेच कृषी विभागाच्या शेतकऱ्यांसाठी असलेल्या विविध योजना याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. खरीप हंगामातील मका पिकाचे उत्पादन व उत्पादकता वाढविण्यासाठी सुधारित वाण, संतुलित खत व्यवस्थापन, योग्य कीड व रोग नियंत्रण आणि आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याचे आवाहन करण्यात आले.

यावेळी सहाय्यक प्राध्यापिका जयश्री राऊत यांनी लष्करी अळीच्या प्रादुर्भावाची लक्षणे, प्रतिबंधात्मक उपाय, जैविक व रासायनिक नियंत्रण तसेच सामूहिकरीत्या कीड व्यवस्थापनाचे महत्त्व याविषयी शेतकऱ्यांना सविस्तर माहिती देण्यात आली. प्राध्यापिका सोनम मेघडंबर यांनी मृदा परीक्षणाच्या आधारे खतांचा संतुलित वापर करून उत्पादन खर्च कमी करण्यासोबतच जमिनीची सुपीकता टिकविण्याचे आवाहन करण्यात आले. कृषि अधिकारी मा.श्री विजय सोमवंशी यांनी कृषी विभागाच्या विविध शासकीय योजनांची माहिती देताना पात्र शेतकऱ्यांनी योजनांचा लाभ घेऊन आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा स्वीकार करावा, चर्चासत्रादरम्यान शेतकऱ्यांनी विविध प्रश्न उपस्थित केले. त्यांच्या प्रश्नांना मार्गदर्शनपर उत्तरे देत शास्त्रीय शेती पद्धतींचा अवलंब करण्याचे आवाहन केले.

ग्रामीण कृषी जागरूकता कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत आयोजित या चर्चासत्रामुळे शेतकऱ्यांना खरीप हंगामातील पीक व्यवस्थापन, कीड नियंत्रण, मृदा आरोग्य आणि शासकीय योजनांबाबत उपयुक्त माहिती मिळाली.

# स्थानिक युवकांना नोकरीवर न घेणाऱ्या उद्योजकांना पाठशी घालू नका– ना. राधाकृष्ण विखे पाटील

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** सुपा औद्योगिक वसहती मधील कंपन्याच्या प्रदूषित पाण्याबाबत गांभीर्याने दखल घेवून संबंधित कंपन्याच्या विरोधात तातडीने कारवाई करण्याचा प्रस्ताव तयार करावा. स्थानिक युवकांना नोकरीवर न घेणाऱ्या उद्योजकांना पाठशी घालू नका, असे निर्देश जलसंपदा तथा पालक मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले.

सुपा औद्योगिक वसहती मधील उद्योगांकडून निर्माण झालेले प्रश्न जाणून घेण्यासाठी मंत्री विखे पाटील यांच्या उपस्थितीत नागरीक अधिकारी यांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. आ.काशिनाथ दाते भाजपाचे अध्यक्ष राहुल शिंदे प्रा.विश्वनाथ कोरडे अतिरीक्त जिल्हाधिकारी शैलेंद्र हिंगे औद्यगिक विकास महामंडळाचे गणेश राठोड यांच्यासह प्रदूषण नियंत्रण मंडळ महसूल विभाग सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

मंत्री विखे पाटील यांनी प्रत्येक प्रश्नाचा आढावा घेवून समस्या सोडविण्यासाठी काय उपाय करता येईल यावर बैठकीत भर दिला.कंपन्या मधून सोडण्यात येणार्या प्रदूषित पाण्याची गंभीर समस्या मोठी आहे.अनेक वर्ष पाणी नैसर्गिक स्त्रोतामध्ये सोडण्यात येत असलेला आरोप उपस्थित नागरिकांनी केला.याबाबत संबधित कंपन्यांची माहीती तातडीने संकलित करून कारवाईचा अहवाल सादर करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.



औद्यगिक वसाहती मधील वाढते अतिक्रमण रस्त्याबाबत सार्वजनिक बांधकाम व राष्ट्रीय महामार्गाच्या अधिकाऱ्यांनी निर्धारीत वेळेत अतिक्रमण काढण्याची मोहीम राबवावी.सुपा बसस्थानक परिसरात सुध्दा होणारी वाहतूक कोंडी कमी करण्याच्या दृष्टीने निर्णय करावा.पावसाळ्यात ड्रेनजचे पाणी रस्त्यावर येत असल्याने नागरीकांना होत असलेल्या त्रासाबाबत बैठकीत गांभीर्याने चर्चा झाली.वाहतुक कोंडी होत असलेल्या कालावधीत जादा संख्येने वाहतुक पोलीस नियुक्त करण्याच्या सूचना मंत्री विखे पाटील यांनी पोलीस प्रशासनास दिल्या.

अनेक उद्योजकांनी बाहेरून कामगार आणल्याने स्थानिक तरुणांना नोकरीच्या संधी मिळत नाहीत ही अत्यंत गंभीर बाब असून भूमीपुत्राना प्राधान्य देणे आवश्यक असल्याचे मत मंत्री विखे पाटील यांनी व्यक्त केले.यासंदर्भात औद्यगिक विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी गांभिर्याने लक्ष घालून माहीती सादर करावी पुढील आठवड्यात कामगार आयुक्तां समवेत बैठक घेवून पुढील कार्यवाही करण्याची ग्वाही त्यानी उपस्थित तरूणांना दिली.

# अखिल भारतीय ज्योतिष संमेलनात अहिल्यानगरचे ज्योतिषाचार्य विजयकुमार कुलकर्णी यांचा गौरव

## ज्योतिष शास्त्रातील सेवाभावी कार्याची दखल

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** पुणे येथे आयोजित करण्यात आलेल्या अखिल भारतीय ज्योतिष संमेलनात अहिल्यानगरचे ज्योतिषाचार्य विजयकुमार कुलकर्णी यांचा त्यांच्या ज्योतिषशास्त्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल विशेष सन्मान करण्यात आला. भालचंद्र ज्योतिर्विद्यालयाच्या वतीने आयोजित या संमेलनात मान्यवरांच्या उपस्थितीत कुलकर्णी यांना सन्मानचिन्ह प्रदान करून गौरविण्यात आले.

संमेलनाच्या स्वागताध्यक्ष डॉ. सीमा गाडेकर आणि रमल ज्योतिषतज्ज्ञ पुष्पलता शेवाळे यांच्या हस्ते ज्योतिषाचार्य विजयकुमार कुलकर्णी यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी महाराष्ट्राचे माजी कृषिमंत्री शशिकांत सुतार तसेच भारतीय क्रिकेट संघाचे माजी कर्णधार आणि पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित चंद्रकांत बोर्डे यांच्यासह ज्योतिष, अध्यात्म व विविध क्षेत्रांतील मान्यवर



उपस्थित होते.

अखिल भारतीय ज्योतिष संमेलनामध्ये देशातील विविध भागांतून आलेल्या ज्योतिष अभ्यासक, विद्वान आणि तज्ज्ञांनी सहभाग घेतला. यावेळी ज्योतिषशास्त्रातील विविध विषयांवर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. ज्योतिषशास्त्रातील बदलते प्रवाह, त्याचा अभ्यास, विविध पद्धती आणि समाजाला योग्य मार्गदर्शन देण्यामध्ये ज्योतिषाची भूमिका यासह विविध विषयांवर विचारमंथन करण्यात आले.

या संमेलनात ज्योतिषाचार्य विजयकुमार कुलकर्णी यांचा विशेष सन्मान करण्यात आला. कुलकर्णी हे अनेक वर्षांपासून ज्योतिषशास्त्राच्या क्षेत्रात कार्यरत असून, या काळात त्यांनी अनेक नागरिकांना ज्योतिषशास्त्राच्या माध्यमातून योग्य मार्गदर्शन केले आहे. ज्योतिषशास्त्राचा सखोल अभ्यास, अनुभव आणि मार्गदर्शनाची त्यांची पद्धत यामुळे त्यांना या क्षेत्रात विशेष ओळख निर्माण झाली आहे.

ज्योतिषशास्त्राचा अभ्यास केवळ भविष्यकथनापुरता मर्यादित न ठेवता त्याचा समाजाभिमुख पद्धतीने उपयोग करण्यावर कुलकर्णी यांनी भर दिला आहे. अनेक वर्षांच्या कार्यकाळात त्यांनी विविध व्यक्तींना त्यांच्या अडचणी व प्रश्नांबाबत मार्गदर्शन केले. त्यांच्या अभ्यासू वृत्तीबरोबरच सेवा भावना आणि समाजाभिमुख कार्याची दखल घेत अखिल भारतीय ज्योतिष संमेलनात त्यांचा विशेष गौरव करण्यात आला. या सन्मानाबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# मयत शेतकऱ्याच्या कर्जमाफीसाठी मानक प्रणाली चुकीची - अ‍ॅड. सुरेश लगड

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** राज्य शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजनेस पात्र असलेले काही शेतकरी मयत झालेले आहे .मयत शेतकऱ्यांचे वारसांना कर्जमाफी दिली जाणार असून कर्जमाफीचे समान वाटप करण्याचे आदेश महाराष्ट्र शासनाच्या सहकार विभागाने बँकांना दिला आहे.

हा चांगला निर्णय शासनाने घेतलेला आहे. परंतु मयत शेतकऱ्यांच्या एक ते सहा वारसापर्यंतच समान कर्जमाफी दिली जाणार असे जाहीर केले आहे. जर मयत शेतकऱ्याला सहा पेक्षा अधिक वारस असतील तर सहा नंतरच्या वारसांना तुम्ही कर्जमाफी कशी नाकारु शकणार? खर तर हा सहकार खात्याचा मानक प्रणालीचा निकष सर्वस्वी चुकीचा असा आहे. जिल्ह्यात जवळपास ३७११ शेतकरी मयत झालेले आहेत. माननीय मुख्यमंत्री महोदय यांनी सदर निर्णयाचा फेरविचार करावा अशी विनंती वजा मागणी अ‍ॅड.सुरेश लगड यांनी एका निवेदनाद्वारे केली आहे.

# वडवाळीच्या बालाजी मंदिराचा होणार कायापालट!

## आमदार विलास भुमरे यांच्या प्रयत्नांना यश; दोन कोटींचा निधी मंजूर

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पैठण–** पैठण तालुक्यातील वडवाळी येथील प्राचीन बालाजी मंदिराच्या विकासासाठी तब्बल दोन कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. आमदार विलास बापू भुमरे यांच्या प्रयत्नांना यश आले असून, या निधीतून मंदिर परिसराचा सर्वांगीण विकास करण्यात येणार आहे.

गोदावरी नदीकाठावरील या प्राचीन मंदिराच्या विकासासाठी आमदार भुमरे यांनी शासनाकडे प्रस्ताव सादर केला होता. ग्रामविकास विभागाने या प्रस्तावाला मंजुरी देत टप्प्याटप्प्याने दोन कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे.

या निधीतून भाविकांसाठी भोजनकक्ष, डोम मंडप, भजन-कीर्तन व धार्मिक कार्यक्रमांसाठी सुसज्ज सभागृह, स्वच्छतागृहे तसेच पार्किंगची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यामुळे वडवाळी बालाजी मंदिर परिसराला यात्रास्थळाचे स्वरूप प्राप्त होण्यास मदत होणार असून, भाविकांचीही मोठी सोय होणार आहे. दरम्यान, किचन शेड व भोजनकक्षासाठी ५० लाख, स्वच्छतागृहासाठी १५ लाख, सभागृहासाठी ७० लाख, डोम उभारणीसाठी ५० लाख आणि पार्किंग ब्लॉकसाठी ३५ लाख रुपये खर्च करण्यात येणार आहेत.

मंदिर विकासासाठी निधी मंजूर झाल्याबद्दल परिसरातील भाविकांनी आमदार विलास भुमरे यांचे आभार मानले आहेत.

# २४ हजार लिटर रॉकेल पैठणमध्ये पडून; जिल्ह्यासाठी आले होते १४४ केएल

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पैठण–** इंधनाच्या वाढत्या दरामुळे सर्वसामान्य नागरिकांना दिलासा मिळावा, यासाठी शासनाकडून रॉकेलचा पुरवठा करण्यात येतो. मात्र पैठण येथे तब्बल २४ हजार लिटर रॉकेल पडून असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. जिल्ह्यासाठी आलेल्या १४४ केएल रॉकेलपैकी पैठण तालुक्याच्या वाट्याला आलेले रॉकेल लाभार्थ्यांपर्यंत पोहोचले नसल्याने पुरवठा विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

शासनाच्या नियमानुसार रेशनकार्डधारकांना निर्धारित दराने रॉकेलचे वितरण करण्यात येते. मात्र पैठण तालुक्यात रॉकेल घेण्यासाठी ग्राहक उपलब्ध नसल्याने मोठ्या प्रमाणात साठा पडून असल्याचे सांगण्यात येत आहे. अर्धा घाऊक रॉकेल विक्रेते आणि रेशन दुकानदार यांच्यामार्फत वितरणाची प्रक्रिया राबविणे अपेक्षित असताना प्रत्यक्षात रॉकेलचा साठा पडून राहिल्याचे चित्र आहे.

दरम्यान, रॉकेल वितरणाबाबत संबंधित यंत्रणेकडून स्पष्ट निर्णय घेणे अपेक्षित असताना विलंब होत असल्याने हा साठा नेमका किती दिवस पडून राहणार, असा सवाल उपस्थित होत आहे. शासनाच्या निर्देशानुसार उपलब्ध रॉकेलचा योग्य वापर करून तो पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. रॉकेलचा साठा पडून असताना त्याच्या वितरणाबाबत प्रशासनाकडून कोणती कार्यवाही केली जाते, याकडे पैठणकरांचे लक्ष लागले आहे.

# शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी तरुणांनी दशरथ सावंतांचा धगधगता आदर्श घ्यावा! - राजू शेट्टी

## राष्ट्र सेवा दलातर्फे शेतकरी योद्धा दशरथ सावंत यांचा शेतकऱ्यांचा आसूड पुरस्काराने भव्य सन्मान; अकोले येथे मान्यवरांची मांदियाळी

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** ''आजचा शेतकरी चहुबाजूने संकटात सापडला आहे. निसर्गाचा लहरीपणा आणि व्यवस्थेची उदासीनता यामुळे बळीराजा होरपळत आहे. अशा भीषण परिस्थितीत केवळ सरकारकडे बोट दाखवून चालणार नाही. शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी आजच्या तरुण पिढीने पुढे आले पाहिजे आणि त्यासाठी आयुष्यभर शेतकऱ्यांसाठी झटणाऱ्या शेतकरी योद्धा दशरथ सावंत साहेबांचा आदर्श तरुणांनी डोळ्यांसमोर ठेवणे काळाची गरज आहे,'' असे परखड आणि प्रेरणादायी प्रतिपादन ज्येष्ठ शेतकरी नेते आणि माजी खासदार राजू शेट्टी यांनी केले. ''आज शेतकरी हतबल झाला आहे. धोरणांच्या जाळ्यात तो अडकला आहे. अशा वेळी दशरथ सावंतांसारखे नेते तरुण पिढीने घडवावेत, ही काळाची गरज आहे. सावंत साहेबांनी आयुष्यभर कोणत्याही पदाची, पक्षाची अपेक्षा न ठेवता शेतकऱ्याच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले. हाच त्यांचा खरा मानबिंदू आहे.'' खासदार राजू शेट्टी यांनी मत व्यक्त केले.



सावंतांचा सन्मान मा. सुशिलाताई दादासाहेब रुपवते यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. याप्रसंगी बोलताना त्या म्हणाल्या, ''शिक्षण, समाजसेवा आणि शेतकरी चळवळ या तिन्ही क्षेत्रांत सावंत साहेबांनी अहोरात्र झटले. त्यांचा सन्मान म्हणजे एका कष्टकरी व्यक्तिमत्त्वाचा सत्कार नव्हे, तर समस्त शेतकरी बांधवांच्या अश्रूंची आणि आशांची जपणूक आहे.'' या ऐतिहासिक सन्मान सोहळ्याला महाराष्ट्रातील साहित्य, शिक्षण, आणि सामाजिक क्षेत्रातील अनेक दिग्गजांची उपस्थिती होती. बहुजन शिक्षण संघाचे चीफ ट्रस्टी अ‍ॅड. संघराज रुपवते, ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ हेरंब कुलकर्णी, शिक्षक नेते हिरालाल पगडाल, अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष सुनील दातीर आणि सेक्रेटरी सुधाकर देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. किसान सभेचे नेते डॉ. अजित नवले, कॉम्रेड कारभारी उगले, डॉ. सागर भालेराव, प्रा. मा.रा. लामखडे, विठ्ठल शेवाळे, अनिकेत घुले, रोहित ढाले, सचिन काकड, एम. डी. सोनवणे,राम चन्ना आदी विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहून दशरथ सावंत यांच्या कार्याला सलाम केला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला राष्ट्र सेवा दलाचे राज्य अध्यक्ष मा. राजा कांदळकर यांनी प्रास्ताविकातून या सोहळ्याची भूमिका आणि राष्ट्र सेवा दलाचा महात्मा फुले द्विशताब्दी वर्षातील संकल्प स्पष्ट केला. कार्यक्रमाचे स्वागत अध्यक्ष आणि अकोले राष्ट्र सेवा दलाचे अध्यक्ष प्रा. महेश पाडेकर यांनी सर्व पाहुण्यांचे व उपस्थितांचे शब्दसुमन आणि पुस्तक देऊन स्वागत केले व विजय पांडे प्रविण मालुंजकर , संतोष नवले,अमोल तळेकर,विशाल शिंदे ,संपत वाळके,गणपत धुमाळ,शिवाजी भोर आदी राष्ट्र सेवा दल व छत्रभारती कार्यकर्ते यांनी नियोजनात मोलाची भूमिका बजावली.

अत्यंत अभ्यासपूर्ण आणि ओघवत्या शैलीत चंद्रशेखर हासे यांनी या संपूर्ण सोहळ्याचे सूत्रसंचालन केले. तर कार्यक्रमाच्या शेवटी सरपंच रवी मालुंजकर यांनी सर्व उपस्थितांचे, संयोजकांचे आणि शेतकऱ्यांचे आभार मानले.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### भारतीय जनता पार्टीच्या निवृत्त अधिकारी प्रकोष्ठच्या शहराध्यक्षपदी हरीश खेडकर



**अहिल्यानगर - सेवानिवृत्त पोलीस उप अधीक्षक हरीश खेडकर यांची भारतीय जनता पार्टी निवृत्त अधिकारी प्रकोष्ठच्या शहराध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. या निवडीचे पत्र राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते श्री खेडकर यांना प्रदान करण्यात आले. यावेळी शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, नगर दक्षिणचे जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग, बाबासाहेब सानप, अशोक गायकवाड आदी उपस्थित होते.**

### गावाच्या विकासासाठी निधीची मागणी



**अहिल्यानगर- श्रीगोंदा मतदारसंघाचे आमदार विक्रमसिंह पाचपुते यांच्या जनता दरबारात कौडगाव येथील ग्रामपंचायत सदस्य तथा खेडेगाव विकास संघटनेचे अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष बाबासाहेब सहादू धीवर यांनी कौडगावच्या विविध विकासकामांसाठी निधी उपलब्ध करून देण्याची मागणी करणारे निवेदन आमदार पाचपुते यांना दिले. कौडगाव येथे जि.प. प्राथमिक शाळेचे सुशोभीकरण, गावअंतर्गत रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण, डॉ. बाबासाहेब आंबेडकर इमारतीसह वाचनालय व ग्रंथालयाची उभारणी तसेच युवकांसाठी क्रीडांगणाचे सुशोभीकरण या कामांची अत्यंत आवश्यकता असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या कामांसाठी आमदारांच्या निधीतून आवश्यक निधी उपलब्ध करून देऊन गावाच्या विकासाला चालना द्यावी, अशी मागणी धीवर यांनी केली. यावेळी बाबासाहेब धीवर म्हणाले, ''कौडगावच्या विकासासाठी शिक्षण, रस्ते, वाचनालय आणि क्रीडा सुविधा या मूलभूत गरजा आहेत. गावातील विद्यार्थ्यांना चांगल्या शैक्षणिक सुविधा, युवकांना क्रीडांगण आणि ग्रामस्थांना दर्जेदार रस्ते उपलब्ध झाले तर गावाच्या विकासाला निश्चितच गती मिळेल. त्यामुळे या कामांसाठी निधी उपलब्ध करून देण्यासाठी आमदारांनी पुढाकार घ्यावा.'' निवेदन स्वीकारताना आमदार विक्रमसिंह पाचपुते यांनी गावाच्या विकासासाठी सकारात्मक प्रतिसाद देत निधी उपलब्ध झाल्याबरोबर कौडगावच्या विकासासाठी आवश्यक ती कामे मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन दिले. गावाच्या विकासासाठी आवश्यक असलेल्या कामांचा पाठपुरावा करण्याची ग्वाहीही त्यांनी दिली. जनता दरबारात निवेदन देताना बाबासाहेब धीवर यांच्यासोबत तहसीलदार कुलथे साहेब, कौडगावचे ग्रामसेवक गणेश गांगर्डे, दशमी गव्हाणेचे सरपंच बाबासाहेब काळे तसेच गाव व नगरदेवळे गटातील विविध सरपंच आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीमुळे गावाच्या विकासाच्या प्रश्नांना व्यापक पाठबळ मिळाले. कौडगावच्या प्रलंबित विकासकामांसाठी निधी उपलब्ध करून देण्याच्या मागणीला आमदार पाचपुते यांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याने ग्रामस्थांमध्ये समाधान व्यक्त होत असून, निधी उपलब्ध झाल्यानंतर ही कामे प्रत्यक्षात मार्गी लागण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.**

# आनंदऋषीजी नेत्रालय येथे लवकरच नेत्रपेढी उभारण्यात येणार - डॉ. प्रकाश कांकरिया

**नेत्र शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद; ५५० रुग्णांची तपासणी**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** कत्तलखान्याच्या जागेवरील आरक्षण काढून आरोग्य मंदिराची उभारणी करण्यात आली आहे. यासाठी समाजाने मोठा पाठिंबा दिला आहे.मानवसेवा व देशसेवा करण्याच्या उद्देशानेच आनंदऋषीजी हॉस्पिटलचे कार्य सुरू आहे. गेल्या आठ वर्षांपासून आनंदऋषीजी नेत्रालयाची नेत्रदीपक कामगिरी सातत्याने सुरू असून,आतापर्यंत दीड लाख मोतीबिंदू शस्त्रक्रिया यशस्वीपणे करण्यात आल्या आहेत.नेत्रालयाचा नावलौकिक महाराष्ट्रासह देशभरात झाला आहे. समाजातील गोरगरीब व गरजू रुग्णांना मोफत व अल्पदरात नेत्रसुविधा देण्यासाठी या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.आज समाजाला नेत्रपेढीची गरज आहे. आनंदऋषीजी नेत्रालयात तज्ज्ञ व निष्णात डॉक्टरांची टीम कार्यरत आहे.येणाऱ्या वर्षात लवकरच येथे नेत्रपेढीची उभारणी करण्यात येणार असल्याचे प्रतिपादन प्रसिद्ध नेत्रतज्ज्ञ डॉ.प्रकाश कांकरिया यांनी केले.

राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी म.सा. यांच्या १२६ व्या जयंतीनिमित्त स्व. कन्हैयालालजी व स्व. मानकंवरबाई कांकरिया यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ डॉ.प्रकाश कांकरिया,सौ.डॉ.सुधाताई कांकरिया व कांकरिया परिवार यांच्या वतीने नेत्ररोग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.याप्रसंगी पियुष बाफना(धुळे),सचिन बांठिया(पनवेल),जैन सोशल फेडरेशनचे सदस्य डॉ. वसंत कटारिया,सतीश लोढा, सुभाष मुनोत,वसंत चोपडा, शिबिराचे तज्ज्ञ डॉक्टर –डॉ. प्रकाश कांकरिया, डॉ.अशोक महाडिक,डॉ.संदीप राणे, डॉ. प्रतीक कटारिया,डॉ.विशाल तांबे,डॉ.किरण शिंदे,डॉ.नेहा भराडिया,डॉ.केतन राठोड, डॉ.विवेक पाऊलबुद्धे,डॉ. नलिनी गीते,डॉ. कौस्तुभ घोडके,डॉ.निरंजन पेहेरे,डॉ. पूनम लंकेश्वर यांच्यासह सुरज शिनगारे, किरण कवडे आदी उपस्थित होते.

डॉ. सुधाताई कांकरिया म्हणाल्या, अनुभवसंपन्नता, कौशल्य व गुरुदेवजींचा आशीर्वाद यामुळे नेत्रालयातील शस्त्रक्रिया यशस्वी होत आहेत. जीवनात आरोग्यसंपन्नता आणण्यासाठी डोळे हे महत्त्वाचे इंद्रिय आहे. डोळे निरोगी असल्यास आपण व्यवसाय करू शकतो, सहजतेने वावरू शकतो तसेच आनंदी जीवन जगू शकतो. डोळ्यांअभावी मानवाचे जीवन अत्यंत कठीण असते. भारतीय संस्कृतीने सांगितल्याप्रमाणे ''तमसो मा ज्योतिर्गमय'' – अंधाराकडून प्रकाशाकडे, दुःखाकडून सुखाकडे जाण्यासाठी दृष्टी असणे खूप महत्त्वाचे आहे. ''असेल दृष्टी तर दिसेल सृष्टी'' याप्रमाणे प्रत्येकाला चांगली दृष्टी मिळावी, यासाठी स्व. मानकंवरबाई कांकरिया व स्व. कन्हैय्यालालजी कांकरिया या माता–पित्यांना वंदन करत साईसूर्य नेत्रसेवा व आनंदऋषीजी नेत्रालय यांच्या संयुक्त विद्यमाने नेत्ररोग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात ज्यांना गरज आहे त्यांची शस्त्रक्रिया करण्यात येणार असून, अनेकांना दृष्टी भेट देण्यात येणार आहे.नेत्रतज्ज्ञ डॉ. प्रतीक कटारिया म्हणाले, आनंदऋषीजी नेत्रालयामध्ये १ लाख ५० हजार रुग्णांच्या शस्त्रक्रिया यशस्वी झाल्या आहेत.तसेच २५ व्हिजन सेंटरमार्फत शेजारच्या सहा जिल्ह्यांमध्ये नेत्रालयाचे काम सुरू आहे. ग्रामीण भागातील रुग्णांना आणण्यासाठी बसची सुविधा आहे.तसेच ऑपरेशन केलेल्या रुग्णांना औषधे, लेन्स व काळा चष्मा मोफत या सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. पैशाअभावी कोणताही रुग्ण वंचित राहू नये यासाठी आनंदऋषीजी नेत्रालय कार्य करीत आहे.मराठवाडा, संभाजीनगर,बीड येथील रुग्णांची नेत्रतपासणी करून मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया केल्या जात आहेत.तसेच तारकपूर येथे नेत्रालयाची शाखा एक वर्षापासून सुरू आहे.येथे एका वर्षात दहा हजार रुग्णांची तपासणी करण्यात आली असून ४५० रुग्णांच्या यशस्वीपणे नेत्र शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत. येथे २८ डॉक्टरांची टीम कार्यरत असून बालकांच्या नेत्र शस्त्रक्रिया व रेटिना सारख्या अवघड शस्त्रक्रिया आधुनिक पद्धतीने व उच्च तंत्रज्ञानाचा वापर करून करण्यात येत आहेत.

# माध्यमिक शिक्षक सोसायटी स्वभांडवली करण्यासाठी ऐच्छिक ठेव वाढ अभियानाचा शुभारंभ

**ही शिक्षक सेवकांची संस्था असल्याने विश्वसनीय –शिक्षणाधिकारी संध्याताई गायकवाड**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** अहमदनगर जिल्हा माध्यमिक शिक्षक सोसायटी स्वभांडवली करण्याचा संकल्प घेऊन तसेच कर्जाचे व्याजदर कमी करण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आलेल्या ऐच्छिक ठेव वाढ अभियानाचा शुभारंभ शिक्षणाधिकारी संध्याताई गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आला. सोसायटीचे चेअरमन तथा शिक्षक परिषदेचे जिल्हाध्यक्ष बाबासाहेब बोडखे आणि व्हाईस चेअरमन तथा शिक्षक भारतीचे जिल्हाध्यक्ष आप्पासाहेब जगताप यांच्या संकल्पनेतून या अभियानाला प्रारंभ झाला. यावेळी शिक्षणाधिकारी संध्याताई गायकवाड यांच्यासह चेअरमन, व्हाईस चेअरमन आणि संचालकांनी स्वतः ठेवी ठेवून अभियानाचा शुभारंभ केला.

या प्रसंगी सहकार आयुक्त कार्यालयाचे सेवानिवृत्त अधिकारी सतीश ढमाल, माजी चेअरमन आप्पासाहेब शिंदे, माजी व्हाईस चेअरमन अर्जुन वाळके, संचालक महेंद्र हिंगे, सुनील दानवे, सुरज घाटविसावे, वैशाली दारकुंडे, वर्षा खिलारी, विजय पठारे, अतुल कोताडे, बाजीराव अनभुले, शिवाजी लवांडे, छबू फुंदे, साहेबराव रक्टे, किशोर धुमाळ, संभाजी गाडे, बाळाजी गायकवाड, सुधीर कानवडे, राजेंद्र कोतकर, उमेश गुंजाळ, शिक्षक सोसायटीचे सचिव स्वप्निल इथापे यांच्यासह अमोद नलगे आदी उपस्थित होते.

प्रास्ताविकात चेअरमन बाबासाहेब बोडखे म्हणाले की, आमची सत्ता आली तेंव्हा जिल्हा सहकारी बँकेची मागच्या मंडळाच्या कारकिर्दितील सुमारे १५८ कोटी रुपयांची कॅश क्रेडिटची उचल होती. त्याला १२.५ टक्के व्याजदर व कर्जाचा ७ टक्के व्याजदर होता. मात्र नियमबाह्य कामकाज थांबवून आणि काटकसर करून मागील दीड वर्षात कॅशक्रेडीटची ७२ कोटी रुपयांवर आणल्याचा दावा त्यांनी केला. संस्था स्वभांडवली करण्याच्या उद्देशाने पावले उचलली जात आहेत. शैक्षणिक चळवळीतले पदाधिकारी संचालक म्हणून काम करत असताना सभासदांचे व संस्थेचे हित समोर ठेवून दूरदर्शीपणे कारभार करत आहेत. सध्याचे कर्जाचे व्याजदर न वाढविता ऐच्छिक ठेव वाढ अभियानाच्या माध्यमातून व्याजदर देखील कमी करण्याचा प्रयत्न राहणार असल्याचे बोडखे यांनी स्पष्ट केले. जिल्हा बँकेकडून १२.५ टक्क्यांनी घेतलेले सीसी कमी झाल्यास कर्जाचे व्याजदरदेखील कमी करता येणार असल्याचे त्यांनी सांगितले. त्यासाठीच ऐच्छिक ठेवीचा व्याजदर आम्ही ७.५० टक्के केलेला आहे . त्यामुळे सर्वांच्या ऐच्छिक ठेवी नक्कीच वाढतील हीच अपेक्षा आहे .

माजी चेअरमन आप्पासाहेब शिंदे म्हणाले की, संस्थेला २५ वर्षांनंतर ऊर्जित अवस्थेत आणण्याचे काम परिवर्तन मंडळाचे सर्व संचालक योगदान देत आहेत. मुलींचे होस्टेल तयार करण्यासाठी महापालिका प्रशासनाकडे जागेसाठी पाठपुरावा सुरू आहे. तसेच सोसायटीच्या तिसऱ्या मजल्यावर स्पर्धा परीक्षेसाठी अभ्यासिकेचे काम सुरू असून, यामध्ये सभासदांच्या पाल्यांना स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन मिळणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

सहकार आयुक्त कार्यालयाचे सेवानिवृत्त अधिकारी सतीश ढमाल म्हणाले की, माध्यमिक शिक्षक सोसायटी ही शिक्षक सेवकांची संस्था असून ती स्वभांडवलावर चालली पाहिजे. यासाठी ठेवी वाढविणे गरजेचे आहे. शिक्षक सेवकांची बँक असल्याने ती सुरक्षित असून, सीसी कमी करण्यासाठी पुरेपूर प्रयत्न केले पाहिजेत. संस्था स्वभांडवली झाल्यास त्याचा लाभ सर्व सभासदांना मिळणार आहे. पाच लाख रुपयांच्या ठेवीवर असणाऱ्या इन्शुरन्सची माहिती सभासदांना देण्याची सूचना त्यांनी केली.

## ऑडिओ क्लिपप्रकरणी खेडकरांची नियंत्रण कक्षात बदली; दिवटे यांच्याकडे पारनेर ठाण्याची सूत्रे!

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**पारनेर–** पारनेर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक संतोष खेडकर यांच्याशी संबंधित कथित ऑडिओ क्लिपप्रकरणाची चौकशी पूर्ण होईपर्यंत त्यांची अहिल्यानगर येथील नियंत्रण कक्षात तात्पुरती बदली करण्याचे आदेश पोलिस अधीक्षक सुदर्शन मुमक्का यांनी दिल्याची माहिती समोर आली आहे.

चौकशीवर कोणताही प्रभाव पडू नये, या उद्देशाने ही तात्पुरती प्रशासकीय कारवाई करण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे. दरम्यान, पारनेर पोलिस ठाण्याचा प्रभारी अधिकारी म्हणून पोलिस निरीक्षक सोमनाथ दिवटे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

संतोष खेडेकर यांच्याशी संबंधित कथित ऑडिओ क्लिपप्रकरणी चौकशी सुरू असून, चौकशीचा निष्कर्ष आल्यानंतर पुढील निर्णय घेतला जाणार असल्याचे समजते. खेडेकर यांच्या तात्पुरत्या बदलीनंतर पारनेर पोलिस ठाण्याची प्रशासकीय सूत्रे आता निरीक्षक सोमनाथ दिवटे यांच्या हाती आली आहेत.

नवे प्रभारी निरीक्षक सोमनाथ दिवटे यांच्यापुढे पारनेरमधील कायदा–सुव्यवस्था, गुन्हेगारीला आळा घालणे आणि पोलिस ठाण्याच्या कामकाजाला गतिमान करण्याचे आव्हान असणार आहे.

## जय वीर गोगादेव जन्मोत्सवानिमित्त श्रीराम चौक ते साई मंदिर भव्य मिरवणूक

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** अहिल्यानगर या ऐतिहासिक शहरातील जय वीर गोगादेव जन्मोत्सवानिमित्त १३ मानाच्या नाथांचे आगमन होणार असून गुरुवार दि.२७ ऑगस्ट रोजी दुपारी ३ वाजता सावेडी उपनगरातील पाईपलाईन रोड, एकविरा चौक, श्रीराम चौक ते द्वारकामाई साई मंदिरात भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले आहे.अशी माहिती साई संघर्ष सामाजिक प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष माजी नगरसेवक सुनील त्र्यंबके यांनी दिली.

दरवर्षीप्रमाणे जय वीर गोगादेव जन्मोत्सव निमित्त १३ मानाचे गुरु गोरक्षनाथ निशान आखाडा, नालेगाव निशान आखाडा, भाई भाई निशान आखाडा, बातरी बेडा निशान आखाडा,गोपाल भगत निशान आखाडा, डीपू के राजा, रत्न वस्ताद, बिग्रेड जमदार, ग्यारह भाई,माळीवाडा, मंगल गेट, सिद्धार्थनगर निशान मेल सहभागी होणार आहे. द्वारकामाई साई मंदिरात मिरवणुकीची सांगता महाआरती, भजन, व महाप्रसादाने होईल. यावेळी आ.संग्राम जगताप, आ.अक्षय कर्डिले, महापौर ज्योतीताई गाडे,उपमहापौर धनंजय जाधव, नगरसेविका रोशनीताई त्र्यंबके, संध्याताई पवार, नगरसेवक निखिल वारे, महेश तवले तसेच अशोक पालवे महाराज उपस्थित राहणार आहेत. मान्यवरांच्या हस्ते महाआरती होऊन भजनाचा कार्यक्रम होणार आहे. महाप्रसादाची मंदिराच्या वतीने व्यवस्था करण्यात आली असून या सर्व धार्मिक कार्यक्रमाचा लाभ, नाथांच्या काठीच्या दर्शनाचा लाभ भाविकांनी घ्यावा. तसेच दरवर्षीप्रमाणे मिनी बागड होणार आहे. सर्वांनी सावेडी ची मिनी बागड यामध्ये मोठ्या संख्येने सहभागी होऊन उपस्थित राहावे. असे आवाहन आकाश त्रंबके, योगेश पिंपळे यांनी केले आहे.

# ग्रामीण विकासात सेंट्रल बँकेचा मोठा वाटा- प्रसाद आंधळे

**सेंट्रल बँक ऑफ इंडिया च्या वतीने आयोजित रिटेल क्रेडिट आउटरीच कार्यक्रमात २१ कोटी रुपयांचे कर्जाचे वितरण**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** सेंट्रल बँक ऑफ इंडिया ही सर्वसामान्य ग्राहकांच्या हक्काची पसंतीची स्वदेशी बँकआहे .शेतकरी, शेतीपूरक उद्योग उद्योजक ,लघुउद्योजक ,शिक्षणासाठी उच्च स्वप्न पाहणाऱ्या विद्यार्थ्यापासून सर्वसामान्य नागरिकांचे घरापासून ते गाड्यापर्यंतचे स्वप्न साकार करणारी सेंट्रल बँक ऑफ इंडिया ही सर्वसामान्यांच्या हक्काची बँक आहे . ग्राहकांना उत्कृष्ट आणि सुलभ आर्थिक उत्पादनांची सेवा देण्याच्या उद्देशाने सेंट्रल बँक ऑफ इंडियातर्फे वेळोवेळी ग्राहकांच्या सेवेसाठी कॅम्पचे आयोजन केले जाते.सेंट्रल बँक शेतकरी, गोरगरीब आणि सर्वसामान्यांच्या हितासाठी ग्रामीण भागात खऱ्या अर्थाने काम करत आहे. ग्रामीण विकासात सेंट्रल बँकेचा मोठा वाटा असल्याचे प्रतिपादन अहिल्यानगर क्रीडाईचे उपाध्यक्ष प्रसाद आंधळे यांनी केले.

सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या वतीने देशभरात आयोजित करण्यात आलेल्या रिटेल क्रेडिट आउटरीच प्रोग्राम अंतर्गत सेंट्रल बँक ऑफ इंडिया अहिल्यानगर क्षेत्रीय कार्यालयाच्या वतीने रिटेल क्रेडिट आऊट्रीच कॅम्पचे आयोजन करण्यात आले होते.याप्रसंगी प्रसाद आंधळे बोलत होते .यावेळी बँकेच्या विविध रिटेल कर्ज योजनांची माहिती देऊन ग्राहकांना २१ कोटी रुपयांच्या कर्जाच्या मंजुरी पत्रांचे वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे क्षेत्रीय प्रबंधक नरेशकुमार दुबे होते.याप्रसंगी उद्योजक गोविंद वाघ,सामाजिक वनीकरणाचे अमोल जाधव,विखेपाटील कॉलेज आयटी विभागाचे एच ओ डी दीपक विधाते,विखे .पा. कृषी महाविद्यालयाचे प्रा. डॉ, सोमेश्वर राऊत, मुख्य प्रबंधक संजय कराड, संदीप काळे, प्रशांत जाणघेल आदींसह सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे ग्राहक बँकेचे सेवानिवृत्त अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी नरेशकुमार दुबे म्हणाले की प्रत्येक कुटुंबाचे स्वतःचे घर, गाडी आणि मुलांच्या उच्च शिक्षणाचे स्वप्न असते. हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी सेंट्रल बँक ऑफ इंडिया च्या माध्यमातून रिटेल कर्जाच्या सोप्या आणि सुलभ योजना उपलब्ध करून देत आहे. आमचे उद्दिष्ट अत्यंत पारदर्शक, जलद व वेळेत ग्राहकांपर्यंत कर्ज सेवा पोहोचवणे आहे .१९११ मध्ये सर सोराबजी पोचखानवाला यांनी स्थापन केलेली सेंट्रल बँक ही पूर्णपणे भारतीयांनी सुरू केलेली देशातील पहिली स्वदेशी बँक आहे. आज देशभरात बँकेच्या ४,५०० हून अधिक शाखा कार्यरत आहेत.बँक ग्राहकांच्या दारापर्यंत येऊन पोहोचली आहे .ग्राहकांनी ही आपली जबाबदारी पार पाडली पाहिजेत. कर्जाचा ईएमआय किंवा क्रेडिट कार्डचे बिल अंतिम तारखेच्या १–२ दिवस आधीच भरावे. सिबिल सिस्टीम ही स्वयंचलित असल्याने एका दिवसाचा विलंब स्कोर खराब करू शकतो.फ्री ॲप्सऐवजी अधिकृत संकेतस्थळाचा वापर करा. आपल्या पॅन कार्डचा वापर करून दुसऱ्या कोणी कर्ज तर घेतले नाही ना, किंवा जुने मिटवलेले कर्ज सिबिलमध्ये अजूनही ओपन दाखवत आहे का याची वेळेवर खात्री करून घ्यावी.ग्राहकांनी योग्य ती खबरदारी घेतल्यास त्यांचा सिबिल स्कोर उत्तम राहील आणि बँकेकडून कर्ज मंजुरी मिळताना कोणतीही अडचण येणार नाही, असे ते म्हणाले.

बँकेचे जुने ग्राहक विश्वास जाधव यांनी बँकेच्या बदलत्या कार्यपद्धतीचे आणि तत्पर सेवेचे मनापासून कौतुक केले. ते म्हणाले, मी २००२ पासून सेंट्रल बँकेचा ग्राहक आहे. सेंट्रल बँक शेतकरी, गोरगरीब आणि सर्वसामान्यांच्या हितासाठी ग्रामीण भागात खऱ्या अर्थाने काम करत आहे.

# निघोजकुंड रस्त्याच्या कॉंक्रिटीकरणासाठी निधी द्या; ग्रामस्थांचे आमदार काशिनाथ दाते सरांना निवेदन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** निघोज गावातून कुंड येथील प्रसिद्ध पर्यटनस्थळ व मळगंगा माता मंदिराकडे जाणारा रस्ता अत्यंत खराब झाल्याने या रस्त्याच्या कॉंक्रिटीकरणासाठी निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी समस्त ग्रामस्थ, ग्रुप ग्रामपंचायत व मळगंगा ग्रामविकास ट्रस्टच्या वतीने पारनेरनगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. निवेदनात म्हटले आहे की, निघोज गावाची लोकसंख्या सुमारे २० हजार असून कुंड हे जगप्रसिद्ध पर्यटनस्थळ आहे. कुंड येथे मळगंगा मातेचे मंदिर असल्याने दर्शनासाठी तसेच पर्यटनस्थळ पाहण्यासाठी महाराष्ट्राच्या विविध भागांतून दररोज मोठ्या संख्येने भाविक व पर्यटक येत असतात. मात्र, निघोज ते कुंड हा महत्त्वाचा मार्ग सध्या अत्यंत खराब अवस्थेत



असल्याने भाविक, पर्यटक तसेच स्थानिक नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे निघोज ते कुंड या अंदाजे ३.५ किलोमीटर रस्त्याच्या कॉंक्रिटीकरणासाठी आवश्यक निधी मंजूर करून कामास तातडीने सुरुवात करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. या रस्त्यामुळे निघोज व कुंड परिसरातील नागरिकांसह मळगंगा मंदिर आणि पर्यटनस्थळी येणाऱ्या भाविक व पर्यटकांची मोठी सोय होणार असल्याचे ग्रामस्थांनी नमूद केले. यावेळी प्रभाकर नारायण कवाद, ज्ञानदेव नामदेव लंके, भाऊसाहेब विठोबा लामखडे, वसंत काशिनाथ ढवण, रोहिदास सावकार लामखडे, सोमनाथ दौलत वरखडे व रमेश भाऊ वरखडे आदी ग्रामस्थांच्या वतीने निवेदन देण्यात आले.

**''निघोज - कुंड हा केवळ दोन गावांना जोडणारा रस्ता नसून, तो नागरिकांच्या दैनंदिन गरजांसोबतच मळगंगा माता मंदिर आणि कुंडच्या पर्यटनस्थळाला जोडणारा महत्त्वाचा मार्ग आहे. या रस्त्याची दुरवस्था लक्षात घेता ग्रामस्थांनी केलेली मागणी रास्त असून, त्याला प्राधान्य देऊन आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यासाठी आपण शासनस्तरावर पाठपुरावा करू. भाविक, पर्यटक आणि स्थानिक नागरिकांना सुरक्षित व सुलभ प्रवासाची सुविधा मिळणे ही आपली जबाबदारी आहे. निघोजकुंड रस्त्याच्या कॉंक्रिटीकरणाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी आपण पूर्ण ताकदीने प्रयत्न करू,''**

**आमदार काशिनाथ दाते सर**
**(विधानसभा सदस्य)**

# प्रामाणिक सेवा आणि सामाजिक बांधिलकी हीच ढगे यांच्या कार्याची ओळख– बाजीराव गवारे

**सेवापूर्तीनिमित्त श्रीकांत ढगे यांचा गौरव ; सामाजिक बांधिलकी जपत शासकीय सेवा बजावल्याबद्दल मान्यवरांकडून सत्कार**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जिल्हा परिषद शिक्षण विभागातील प्रदीर्घ शासकीय सेवा यशस्वीपणे पूर्ण करून सेवानिवृत्त झालेले कर्मचारी श्रीकांत उत्तम ढगे यांचा सेवापूर्ती सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. शासकीय सेवेत कर्तव्यनिष्ठेने जबाबदारी पार पाडतानाच सामाजिक बांधिलकी जपत विविध समाजोपयोगी उपक्रमांत योगदान दिल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते त्यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी सभापती, अर्थ व बांधकाम समितीचे मा. श्री. बाजीराव नाना गवारे होते. यावेळी अहिल्यानगरचे प्रथम महापौर मा. श्री. भगवानराव फुलसुंदर, ए.डी.सी.सी. बँकेचे उपाध्यक्ष मा. श्री. संपतराव मस्के, मार्केट कमिटीचे माजी सभापती मा. श्री. बाबासाहेब गुंजाळ, नगरचे माजी पंचायत समिती सदस्य मा. श्री. पोपटराव निमसे तसेच माजी जिल्हा परिषद सदस्य मा. श्री. संदेश कारले यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

यावेळी अध्यक्षीय भाषणात बाजीराव नाना गवारे म्हणाले, ''शासकीय सेवा ही केवळ नोकरी नसून समाजाप्रती असलेली जबाबदारी आहे. श्रीकांत ढगे यांनी ही जबाबदारी अत्यंत प्रामाणिकपणे आणि संवेदनशीलतेने पार पाडली. प्रतिकूल परिस्थितीवर मात करून त्यांनी शिक्षण पूर्ण केले आणि आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर शासकीय सेवेत स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. त्यांच्या सेवाकाळातील कर्तव्यनिष्ठा, सहकार्याची भावना आणि सर्वसामान्यांशी असलेला आपुलकीचा व्यवहार निश्चितच प्रेरणादायी आहे.''

''श्रीकांत ढगे यांनी शासकीय सेवेसोबतच सामाजिक बांधिलकी जपली, ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची मोठी जमेची बाजू आहे. गरजू कुटुंबांना मदत करणे, विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देणे तसेच सामाजिक व धार्मिक उपक्रमांत सहभागी होणे, यातून त्यांची समाजाप्रती असलेली तळमळ दिसून येते. सेवानिवृत्ती हा सेवेला पूर्णविराम नसून नव्या सामाजिक कार्याची सुरुवात आहे. आगामी काळात त्यांनी आपला अनुभव आणि वेळ समाजातील गरजू घटकांसाठी द्यावा. त्यांच्या पुढील आयुष्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा,'' असेही गवारे यांनी सांगितले.

प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण पूर्ण करून श्रीकांत ढगे यांनी जिल्हा परिषद शिक्षण विभागात जबाबदारीने सेवा बजावली. सेवाकाळात शासकीय कर्तव्यांबरोबरच गरजू कुटुंबांना मदत, विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप आणि विविध समाजोपयोगी उपक्रमांमध्ये सहभाग घेत त्यांनी सामाजिक बांधिलकीची जपणूक केली. सत्काराला उत्तर देताना श्रीकांत उत्तम ढगे यांनी सेवाकाळात सहकार्य करणाऱ्या अधिकारी, कर्मचारी, सहकारी, मित्रपरिवार व कुटुंबीयांचे आभार मानले. सेवानिवृत्तीनंतर सामाजिक, शैक्षणिक आणि धार्मिक उपक्रमांसाठी अधिक वेळ देण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला. गरजू व वंचित घटकांसाठी शक्य ती मदत करण्याचा संकल्पही त्यांनी व्यक्त केला.

यावेळी जिल्हा परिषद शिक्षण विभागातील अधिकारी व कर्मचारी, टाकळी काझी, पिंपळगाव माळवी तसेच सारसनगर परिसरातील ग्रामस्थ, मित्रपरिवार आणि नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संदीप गुंजाळ, समीर गुंजाळ व विजय साबळे यांनी केले. शेवटी श्रीकांत उत्तम ढगे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# मुलींमध्ये प्रवरा व मुलांच्या गटात सेंट मायकल्स, प्रवरा अन् सेक्रेड हार्टला विजेतेपद

**। फिरोदिया शिवाजियन्स अकॅडमीच्या आंतरशालेय फुटबॉल स्पर्धेत रंगला अंतिम सामन्यांचा थरार**
**। शंभरहून अधिक सामन्यांत खेळाडूंची चुरस, अंतिम सामन्यांमध्ये टायब्रेकरचा रोमांच**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** फुटबॉलच्या मैदानावर कौशल्य, जिद्द, आक्रमकता आणि विजयासाठीची झुंज यांचा रोमांचक संगम अनुभवायला मिळाला. अहमदनगर महाविद्यालयाच्या मैदानावर झालेल्या फिरोदिया शिवाजियन्स अकॅडमी आयोजित आठव्या आंतरशालेय फुटबॉल स्पर्धेच्या अंतिम सामन्यांमध्ये विजेतेपदासाठी संघांनी अक्षरशः जीवाचे रान केले. काही सामन्यांचा निकाल शेवटच्या क्षणापर्यंत लांबला, तर दोन अंतिम सामने टायब्रेकरपर्यंत रंगले. अखेर १६ वर्षांखालील मुलींच्या गटात प्रवरा पब्लिक स्कूल, १२ वर्षांखालील मुलांच्या गटात सेंट मायकल्स स्कूल, १४ वर्षांखालील मुलांच्या गटात प्रवरा पब्लिक स्कूल आणि १६ वर्षांखालील मुलांच्या गटात सेक्रेड हार्ट कॉन्व्हेंट हायस्कूलने विजेतेपद पटकावले. विजयी संघातील खेळाडूंनी मैदानावर एकच जल्लोष केला.




फिरोदिया शिवाजियन्स अकॅडमीच्या वतीने आयोजित या स्पर्धेचे हे आठवे वर्ष होते. यंदा स्पर्धेला संघांचा विक्रमी सहभाग लाभला. स्पर्धे दरम्यान शंभरपेक्षा अधिक फुटबॉल सामने रंगले. त्यामुळे संपूर्ण कालावधीत अहमदनगर महाविद्यालयाचे मैदान फुटबॉलमय झाले होते. विजयी, उपविजयी व तृतीय क्रमांक मिळवलेल्या संघांना फिरोदिया मेमोरियल फाउंडेशनचे मुख्य विश्वस्त तथा अहमदनगर जिल्हा फुटबॉल असोसिएशनचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया आणि शिवाजियन्स स्पोर्ट्स क्लबचे अध्यक्ष तथा फुटबॉल असोसिएशनचे वरिष्ठ उपाध्यक्ष मनोज वाळवेकर यांच्या हस्ते चषक देण्यात आले. खेळाडूंना मेडल देऊन गौरविण्यात आले. यावेळी फुटबॉल असोसिएशनचे उपाध्यक्ष खालिद सय्यद, सचिव रौनप फर्नांडिस, खजिनदार रिशपालसिंग परमार, सहाय्यक खजिनदार तपन परमार, फिरोदिया शिवाजियन्स अकॅडमी मुख्य आयोजन समितीच्या सदस्य पल्लवी सैंदाणे, राजेश अँथनी, जेव्हिअर स्वामी, सचिन पाथरे, अभय साळवे, अभिषेक सोनवणे यांच्यासह शिवाजियन्स स्पोर्ट्स क्लबचे पदाधिकारी, प्रशिक्षक, पंच, खेळाडू, पालक आणि क्रीडाप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. पाहुण्यांच्या हस्ते विविध श्रेणीतील उत्कृष्ट खेळाडूंना वैयक्तिक बक्षिसेही प्रदान करण्यात आली.

नरेंद्र फिरोदिया म्हणाले की, विद्यार्थी दशेपासूनच फुटबॉलचे खेळाडू घडावे, या उद्देशाने या स्पर्धेचे दरवर्षी आयोजन केले जात आहे. या स्पर्धेमुळे फुटबॉल खेळाला चालना मिळाली असून, शहरातील वातावरण फुटबॉलमय बनले आहे. ही स्पर्धा अजून शानदार होण्यासाठी मनोज वाळवेकर यांचे विशेष योगदान मिळत असून, या खेळासाठी त्यांची मोलाची साथ लाभत असल्याचे त्यांनी सांगितले.

मनोज वाळवेकर म्हणाले की, शहरातील चित्र बदलत असून, फुटबॉलची क्रेझ वाढत चालली आहे. मुलांबरोबर मुलींचे संघ देखील मोठ्या संख्येने स्पर्धेत उतरले आहे. जिल्ह्यातील मुलींचा संघ देखील आपली उत्कृष्ट कामगिरी राज्यात करत असून, या स्पर्धेतून हे खेळाडू पुढे आले असल्याचे स्पष्ट करून त्यांनी फुटबॉलची आवड असलेल्यांना फिरोदिया शिवाजियन्स अकॅडमी सहभागी होण्याचे आवाहन केले.

# शहरात अवघ्या २ रुपयांत एक लिटर शुद्ध पाणी प्रकल्पाचे अनावरण; सेवाप्रीतचा अभिनव उपक्रम

**सीएसआरडी महाविद्यालयाच्या प्रवेशद्वारावर पाण्याचे एटीएम; सर्वसामान्य, कामगार व विद्यार्थ्यांना दिलासा**
**घरेलू मोलकरीण महिलांसाठीही मेळावा; शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्याचा सेवाप्रीतचा संकल्प**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शहरातील सर्वसामान्य नागरिक, कामगार, विद्यार्थी तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना परवडणाऱ्या दरात शुद्ध व सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे, या सामाजिक बांधिलकीतून सेवाप्रीत सोशल फाउंडेशनच्या वतीने नगर–पुणे महामार्गावरील ग्रामीण विकास व अध्ययन केंद्र समाजकार्य व संशोधन संस्था (सीएसआरडी) महाविद्यालयाच्या प्रवेशद्वारावर शुद्ध पिण्याच्या पाण्याचे एटीएम मशीन उभारण्यात आले आहे. अवघ्या २ रुपयांत एक लिटर आर. ओ. शुद्ध पाणी उपलब्ध होणार असल्याने हा उपक्रम नागरिकांसाठी दिलासादायक ठरणार आहे.

शुद्ध पाणी ही केवळ गरज नसून प्रत्येक नागरिकाचा मूलभूत हक्क आहे. मात्र, वाढते शहरीकरण, पाण्याचे प्रदूषण आणि बाटलीबंद पाण्याच्या वाढत्या किमती यामुळे सर्वसामान्यांसमोर सुरक्षित पिण्याचे पाणी मिळविण्याचे आव्हान निर्माण झाले आहे. विशेषतः रोजंदारीवर काम करणारे कामगार, विद्यार्थी, रस्त्यावर व्यवसाय करणारे छोटे व्यावसायिक आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल नागरिक यांना या समस्येचा अधिक सामना करावा लागतो. हीच गरज ओळखून सेवाप्रीतने अत्यल्प दरात शुद्ध पाणी उपलब्ध करून देण्याचा सामाजिक उपक्रम हाती घेतला आहे.

या शुद्ध पिण्याच्या पाण्याच्या एटीएम मशीन प्रकल्पाचे अनावरण सीएसआरडी महाविद्यालयाचे संचालक डॉ. सुरेश पठारे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी




सेवाप्रीत सोशल फाउंडेशनच्या संस्थापक अध्यक्षा जागृती ओबेरॉय, प्रकल्प प्रमुख अर्चना खंडेलवाल, डॉ. सिमरन वधवा, लता राजोरिया, सारिका मुथा, अर्चना कुलकर्णी, रेखा बांब, कीर्ती पारीख, सविता धोखरिया, सीमा राजोरिया, संतोष झालानी, अंजू गुजराती, मंजू झालानी, देवकी कुलवाल, राजश्री रहाणे, अर्चना राजोरिया, नीता बंब, विद्या धोखरिया, न्यायाधार संस्थेच्या ॲड. निर्मला चौधरी, वैशाली सुरेश पठारे तसेच सीएसआरडी महाविद्यालयाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या पाणी एटीएमच्या माध्यमातून नागरिकांना अवघ्या २ रुपयांत एक लिटर आर.ओ. शुद्ध पाणी उपलब्ध होणार आहे. सेवाप्रीत सोशल फाउंडेशनने या प्रकल्पासाठी सुमारे एक लाख रुपयांचा खर्च केला आहे. प्रकल्पाच्या देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी सीएसआरडी महाविद्यालयाकडून पाहिली जाणार आहे. या प्रकल्पातून निर्माण होणारे ड्रेन पाण्याची व्यवस्था देखील झाडांसाठी करण्यात आली आहे. यातून वृक्ष संवर्धनाचा संकल्प देखील साध्य होणार आहे.

नाममात्र दरातून मिळणारा निधी हा प्रकल्पाच्या देखभाल खर्चासाठी वापरला जाणार असून, नागरिकांना शुद्ध पाणी उपलब्ध करून देण्यामागे नफा कमावण्याचा कोणताही उद्देश नसल्याचे सेवाप्रीतने स्पष्ट केले. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल नागरिकांसाठी हे पाणी जवळपास मोफत उपलब्ध करून दिल्यासारखेच आहे.

या प्रकल्पासाठी ५०० लिटर क्षमतेची पाण्याची टाकी बसविण्यात आली असून, एका तासात सुमारे १०० लिटर पाणी उपलब्ध करून देण्याची क्षमता या यंत्रणेची आहे. त्यामुळे महामार्गावरून प्रवास करणारे नागरिक, विद्यार्थी, कामगार आणि परिसरातील नागरिकांनाही याचा लाभ घेता येणार आहे.

डॉ. सुरेश पठारे म्हणाले की, शुद्ध पाणी हा प्रत्येकाच्या जीवनाशी जोडलेला अत्यंत महत्त्वाचा विषय आहे. महाविद्यालयाच्या परिसरात येणारे विद्यार्थी, कर्मचारी, कामगार आणि नागरिक यांना कमी दरात सुरक्षित पाणी उपलब्ध व्हावे, ही अत्यंत चांगली संकल्पना आहे.

# संतोष गांधी यांना 'जैन ओसवाल समाज गौरव पुरस्कार प्रदान

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**




**अहिल्यानगर–** सामाजिक, धार्मिक, अर्थकारण, राजकारण अशा विविध क्षेत्रात दोन दशकापासून अधिक काळापासून सातत्यपूर्ण योगदाने देणारे संतोष फुलचंद गांधी यांना जैन ओसवाल समाज गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. अहिल्यानगर येथील जैन ओसवाल युवक संघाने (जॉईज) हा पुरस्कार दिला आहे. जॉईज आयोजित भव्य कार्यक्रमात जैन श्रावक संघाचे अध्यक्ष हस्तीमलजी मुनोत यांच्या हस्ते संतोष गांधी यांना पत्नी सौ.वर्षा गांधी यांच्यासह हा पुरस्कार प्रदान करून सत्कार करण्यात आला.

यावेळी अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया, जैन ओसवाल पंचायत सभेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया, उपाध्यक्ष सीए अशोक पितळे, राजेंद्र चोपडा, प्रधान मंत्री शैलेश मुनोत, जॉईजचे अध्यक्ष भूषण भंडारी, जैन ओसवाल पंचायत सभा, जॉईजचे पदाधिकारी, सदस्य व समाजबांधव उपस्थित होते.

संतोष गांधी मागील २० वर्षापासून सामाजिक, धार्मिक, आर्थिक, राजकारणात सक्रिय आहेत. आचार्यश्रींवर नितांत श्रध्दा असलेल्या गांधी यांनी मानव सेवेवर कायम भर दिला आहे. जैन ओसवाल पंचायत सभा, जैन वात्सल्य संस्था, सहकारमहर्षी सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल पतसंस्थेचे माजी चेअरमन व विद्यमान संचालक, सहकारी ग्राहक भांडार, भारतीय जनता पक्षाचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य अशा विविध संस्था, संघटनांवर ते कार्यरत आहेत. जैन ओसवाल पंचायत सभेच्या माध्यमातून समाजातील गरजूंना आवश्यक ती मदत करून त्यांना सन्मानाने उभे करण्यात ते अग्रेसर असतात. वात्सल्य संस्थेच्या माध्यमातूनही दर महिन्याला गरजू कुटुंबाना अन्नधान्य, किराणा दिला जातो. जैन ओसवाल पतसंस्थेचे चेअरमनपद भूषविताना संस्थेने १०० कोटींच्या ठेवींचा पल्ला गाठला. संस्थेची जुनी वसूली प्रभावीपणे करून संस्थेच्या अर्थकारणाला बळकटी दिली तसेच विविध योजनांच्या माध्यमातून पतसंस्थेच्या व्यवसाय वृध्दीत योगदान दिले आहे. सभासदांना केंद्रस्थानी ठेवून उत्कृष्ट आर्थिक कामकाजाची परंपरा त्यांनी कायम राखली. संचालक म्हणूनही संस्थेच्या प्रगतीत ते सातत्याने योगदान देत आहेत. भाजपचे सक्रिय पदाधिकारी म्हणून ते शासनाच्या योजना सर्वसामान्यांपर्यंत पोहचविण्यासाठी प्रयत्नशील असतात. धार्मिक कार्यातही त्यांचा हिरीरीने सहभाग असतो. साधूसाध्वीजींची सेवा करण्यात ते रममाण होतात.

दिनदुबळ्यांची सेवा व गरजूंना मदत ही संतांची शिकवण ते कायम आचरणात आणतात. समाजासाठी चांगले काही तरी करण्याची आवड असल्याने स्वत:च्या कुरिअर व्यवसायाचा मोठा व्याप सांभाळून ते सामाजिक कार्यासाठी नियमित वेळ काढतात. त्यांच्या याच कार्यामुळे जैन ओसवाल समाज गौरव पुरस्काराने त्यांचा उचित सन्मान झाला आहे. या पुरस्काराबद्दल त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## शिवदुर्गा संवाद दौऱ्याच्या माध्यमातून पक्षात महिलांचा सहभाग वाढवून पक्ष संघटना अधिक बळकट करणार – आ. डॉ. मनीषा कायंदे

**शिर्डीत शिवदुर्गा संवाद दौरा संपन्न**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**शिर्डी–** शिवसेनेचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतत्वाखाली महिला शिवसेनेच्या वतीने सुरू असलेल्या शिवदुर्गा संवाद'' दौऱ्याच्या माध्यमातून ग्रामीण भागातील महिलांशी थेट संवाद साधून त्याच्या समस्या, अडचणी आणि अपेक्षा जाणून घेतल्या जात आहेत, यावेळी पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यासोबतच महिलांचा संघटनेतील सहभाग व्यापक करण्यावर भर देणार असल्याचे शिवसेना सचिव आमदार डॉ. मनीषा कायंदे यांनी सांगितले या प्रसंगी खासदार भाऊसाहेब वाकचौरे साहेब,आ मनिषाताई कायंदे ,कल्पनाताई करजे,सरीताताई कोल्हे,सुषमाताई उबाळे यांनी मार्गदर्शन केले याप्रसगी जिल्हा प्रमुख कमलाकर कोते,नितीनराव औताडे,अनिताई जगताप,सुनिताताई शेळके,मिनाक्षी डूबल,आरती गाढे,मीनाक्षी वाकचौरे,नगरसेविका सुनिता गोंदकर,आशा कोते,महेश देशमुख,सागर बोठे,रावसाहेब थोरात अदि पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

(पान १ वरून)

## तीन पसार आरोपींना संभाजीनगर येथून अटक

पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी दोन विशेष तपास पथके स्थापन केली. गुप्त बातमीदार, सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे पथकाने शोध सुरू केला. आरोपी राजगुरुनगर (पुणे) येथे असल्याची माहिती मिळताच पथक तेथे पोहोचले; मात्र आरोपी तेथून पसार झाले होते. त्यानंतर २४ ऑगस्ट रोजी मुख्य आरोपी सोनू कोहक साथीदारांसह छत्रपती संभाजीनगरमधील वाळुंज, पंढरपूरजवळील एमआयडीसी परिसरात लपल्याची खात्रीशीर माहिती मिळाली. पथकाने तात्काळ सापळा रचून तिन्ही आरोपींना ताब्यात घेतले.

## 'समान काम, समान वेतन' मागणीसाठी न्यायालयीन कर्मचारी संपाच्या पवित्र्यात - अंकुश सांगळे

प्रतिकूल परिस्थितीत दुय्यम न्यायालयीन कर्मचारी आपले कर्तव्य बजावत आहेत. मात्र, त्यांच्या वेतनातील असमानतेचा प्रश्न आता ऐरणीवर आला आहे.

उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांप्रमाणेच दुय्यम न्यायालयातील कर्मचाऱ्यांनाही वेतन मिळावे, याबाबतचा प्रस्ताव उच्च न्यायालयाने मंजूर करून शासनाकडे पाठविला आहे. मात्र हा प्रस्ताव अद्याप मंत्रालयात प्रलंबित आहे. शासनाने हा प्रस्ताव तातडीने मंजूर करून कर्मचाऱ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी सांगळे यांनी केली.

मागणी मान्य न झाल्यास १६ सप्टेंबर तसेच १६ व १७ ऑक्टोबर रोजी न्यायालयीन कर्मचारी काळ्या फिती लावून काम करतील. त्यानंतर ५ नोव्हेंबर रोजी एक दिवस सामूहिक रजा घेण्यात येईल. तरीही शासनाने मागण्या मान्य न केल्यास १७ नोव्हेंबरपासून सर्व न्यायालयीन कर्मचारी बेमुदत संपावर जातील, असा इशारा अंकुश सांगळे यांनी दिला. अंकुश सांगळे पुढे म्हणाले की, समान कामासाठी समान वेतन मिळणे हा न्याय आणि मूलभूत हक्क आहे. हा हक्क डावलला जाणे यापुढे कोणत्याही परिस्थितीत स्वीकारले जाणार नाही, अशी ठाम भूमिका संघटनेने घेतली आहे. वर्षानुवर्षे प्रलंबित असलेल्या या प्रश्नाकडे शासन व संबंधित प्रशासनाने गांभीर्याने पाहून तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी त्यांनी केली. यावेळी बंडू बडे आणि सविता भालेराव यांनीही उपस्थित न्यायालयीन कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले. न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांसाठी संघटनेने एकजुटीने भूमिका घेण्याची आवश्यकता असून, समान काम समान वेतनाच्या मागणीसाठी सुरू असलेल्या लढ्याला सर्व कर्मचाऱ्यांनी पाठिंबा द्यावा, असे आवाहन त्यांनी केले. संघटनेचे कार्याध्यक्ष शिरीष ढाळे म्हणाले की, न्यायालयीन कामकाजाचा मोठा भार सांभाळताना मनुष्यबळाची कमतरता, वेळेची मर्यादा आणि विविध प्रशासकीय जबाबदाऱ्या पार पाडूनही न्यायालयीन कर्मचारी आपले कर्तव्य निष्ठेने बजावत आहेत. मात्र, त्याच कामाच्या तुलनेत वेतनामध्ये निर्माण झालेली असमानता कर्मचाऱ्यांच्या मनातील असंतोषाला कारणीभूत ठरत आहे. त्यामुळे आता केवळ निवेदने आणि विनंत्यांपुरते मर्यादित न राहता संघटित आंदोलनाची तीव्रता वाढविण्यापूर्वी शासनाने संघटनेशी तातडीने चर्चा करून हा प्रश्न मार्गी लावावा, अशी मागणी त्यांनी केली. न्यायव्यवस्था सुरळीत चालविण्यासाठी अहोरात्र योगदान देणाऱ्या न्यायालयीन कर्मचाऱ्यांना त्यांच्या हक्काचे वेतन मिळणे ही शासनाची जबाबदारी आहे. 'समान काम, समान वेतन' हा आमचा न्याय्य हक्क असून, तो मिळेपर्यंत संघर्ष सुरूच राहील, अशी भूमिका संघटनेच्या वतीने स्पष्ट करण्यात आली.

## सव्वाचार लाखांचा गुटखा जप्त

करण्यात आला. यात आरोपी वसीम मेहमूद खान फरार आहे. तर दुसऱ्या कारवाईत ६ हजार ८०९ रुपयांच्या साठ्यासह अझहर दिलावर पठाण (वय ३७) याला ताब्यात घेण्यात आले. या प्रकरणात आत्तु उर्फ आदिब पठाण व पाशा उर्फ फिरदोषखान पठाण (दोघे रा. शेवगाव) फरार आहेत. या सर्व प्रकरणांत भारतीय न्याय संहितेनुसार गुन्हे नोंदवण्यात आले आहेत.

## दहशत माजवणारे चौघे जेरबंद

चार जण दुचाकीवर धारदार शस्त्रांसह फिरून भीतीचे वातावरण तयार करत आहेत. माहिती मिळताच तपास पथकाने तातडीने तेथे धाड टाकून चौघांना ताब्यात घेतले. संस्कार प्रकाश येवलेकर (वय २२) व ईश्वर गणेश नवसुपे (वय २२, दोघे रा. गजानन कॉलनी, नवनागापूर, अहिल्यानगर) आणि दोन विधीसंघर्षित बालके अशी पकडलेल्यांची नावे आहेत. पंचांसमक्ष घेतलेल्या अंगझडतीत त्यांच्याकडून धारदार कोयता, कत्ती, चाकू आणि दोन दुचाकी जप्त करण्यात आल्या.याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोहेकॉ गणेश चौधरी करत आहेत.

सदर कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे व उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमने यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि हेमंत थोरात सफौ राकेश खेडकर, पोहेकॉ शैलेश रोहोकले, पोहेकॉ बापूसाहेब फोलाणे, पोहेकॉ देविदास खेडकर, पोहेकॉ राजू सुद्रीक, पोकॉ दीपक फुंदे, पोकॉ नवनाथ दहिफळे, पोकॉ किशोर जाधव, पोकॉ संपत खेडकर यांच्या पथकाने केली.